स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास"

मानव विज्ञान विद्याशाखेच्या राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संकल्पित संशोधन आराखडा

: संशोधक :

आश्विनी रामराव मगर

: मार्गदर्शक :

डॉ.विलास आघाव

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

: संशोधन केंद्र :

पीपल्स कॉलेज, नांदेड

जुलै २०२३

"यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा अभ्यास करताना प्रथम भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचा इतिहास पाहणे आवश्यक ठरते. खरेतर ब्रिटिश काळात विविध इलाख्यांमध्ये विखूरलेल्या मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन व्हावे यासाठी महाराष्ट्राला मोठा लढा द्यावा लागला. त्यासाठी सुरु झालेला हा काही अपघात नव्हता किंवा कुणाच्यातरी विरोधात उभी राहिलेली ती चळवळ नव्हती. या चळवळीत महत्त्वाच्या ठरलेल्या 'मराठ्यांची अस्मिता', 'महाराष्ट्र धर्म' या संकल्पनांचे जागरण आणि इतिहासाचे पुनरावलोकन त्यासाठी सुमारे १०० वर्षे सतत चालू होते. ब्रिटिश काळात मद्रास, कोलकाता आणि मुंबई ही प्रमुख केंद्रे होती. ब्रिटिश शासनाने भारताची ५-६ प्रांतात विभागणी केली होती. त्यांना नॉर्थ प्रॉव्हिन्स, सेंट्रल प्रॉव्हिन्स, बॉम्बे प्रॉव्हिन्स अशी नावे होती. मराठीत त्याला इलाखा असे म्हटले जाई. इतर भागांचा उल्लेख मात्र उत्तर प्रांत, मध्य प्रांत असा केला जात असे. त्या-त्या भागातल्या ब्रिटिश सेनांनी जसजसे एक एक प्रदेश जिंकले, तसे त्या प्रांताना ते जोडले गेले. त्यामुळे या इलाख्यांना कोणतीच तर्कसंगती नव्हती. मुंबई इलाखा तर थेट उत्तरेला सिंध प्रांतापासून सुरु होऊन दक्षिणेला धारवाडपर्यंत पसरलेला होता. पुन्हा या सगळ्या प्रदेशातील संस्थाने स्वतंत्र होती. यामुळे हे अवाढव्य प्रदेश वेगळे करून छोटी राज्य करणे आवश्यक होते, पण ब्रिटिशांना मात्र त्यात फारसा रस नव्हता.

या पार्श्वभूमीवर ती १९१२ च्या राष्ट्रीय सभेच्या कॉंग्रेस अधिवेशनात मुंबई इलाख्यातून सिंधी भाषिकांचा प्रदेश वेगळा काढून त्याचे एक स्वतंत्र राज्य बनवावे, अशी सूचना मांडली गेली. त्याचबरोबर मुंबई प्रांतातून तेलगू भाषिकांना वेगळे काढून त्यांचे वेगळे

तेलगू भाषिक राज्य करावे असेही सूचविले गेले. या सूचनांवर चर्चाही झाली, पण निर्णय मात्र झाला नाही. त्यानंतर १९२० मध्ये मोतीलाल नेहरू, तेजबहादूर सप्रु समितीने भाषावार प्रांतरचना असावी अशी शिफारस केली होती. त्यानुसार नागपूर काँग्रेसमध्ये पक्षाच्या घटनेत बदल करण्यात आला आणि भाषेच्या तत्वावर प्रांतिक काँग्रेस कमिटी करण्याचे ठरले. स्वातंत्र्यपूर्व काळातच काँग्रेसने भाषावर प्रांत पुनर्रचनेचे तत्व स्वीकारले होते.

१९२७ साली 'इंडियन स्टॅट्युटरी कमिशन' ला भाषावार तत्वानुसार प्रांतांची पुनर्रचना करावी अशी विनंती काँग्रेसने केलेली होती. तसेच भारताच्या भावी राज्यघटनेचा आराखडा कसा असावा यासंदर्भात मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश शासनाने नियुक्त केलेल्या सर्वपक्षीय नेहरू अहवालाने भाषेवर आधारीत प्रांताची पुनर्रचना करण्याची शिफारस केलेली होती. त्यानंतर १९४५-४६ सालच्या काँग्रेसच्या निवडणूक जाहिरनाम्यात भाषावार प्रांतरचनेचा पुनरुच्चार केलेला आढळतो. या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण यांच्यावरील वैचारिक प्रभाव आणि त्यांची जडणघडण यांचा संबंध संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील भूमिकेशी कशा प्रकारचा राहिलेला आहे ते जाणून घेण्यासाठी त्यांचा जीवनपरिचय अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते.

यशवंतराव चव्हाण हे एक मुत्सद्दी राजकीय व्यक्तिमत्व होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत जनतेच्या तसेच देशाच्या हिताच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे कार्य केलेले आहे. यशवंतरावांच्या राजकीय कारकीर्दीचा अभ्यास करतांना त्यांची जडण-घडण कशा प्रकारे झाली. यशवंतरावांना राजकीय चळवळीत प्रवेशासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या. कोणत्या गोष्टींचा प्रभाव त्यांच्यावर पडला, त्याचबरोबर त्यांचा राजकीय पिंड घडण्यामागे कोणती पार्श्वभूमी कारणीभूत होती. त्यांनी राजकीय सत्तेत स्वत:ला कसे स्थिर केले,त्यातून त्यांची पुढील वाटचाल कशी झाली, ते राजकीय सत्तेशी समरुप होत असतांना समकालीन परिस्थिती कशा प्रकारची होती हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

यशवंतराव चव्हाण यांच्या जडण-घडणीत प्रामुख्याने समकालीन राजकीय आणि सामाजीक परिस्थिती फार मोठया प्रमाणात कारणीभूत आहे. त्यांच्या राजकीय जडणघडणीमध्ये कौटुंबिक संस्कार, शालेय वातावरण, महाविदयालयीन जीवनातील त्यांची वाटचाल, याबरोबरच भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी शालेय जीवनातच घेतलेला सक्रिय सहभाग ज्यामुळे त्यांना अटकही झाली. परंतु कारावासादरम्यान त्यांनी केलेले चौफेर वाचन तसेच क्रांतीकारकांचा प्रभाव, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी दरम्यान त्यांची भूमिका व योगदान , या चळवळीत त्यांना आलेला बरा-वाईट अनुभव या सर्व बाबींचा त्यांचावर पडलेला सखोल प्रभाव यशवंतराव चव्हाण यांच्या जडण-घडणीस महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. तसेच त्यांच्या जडण-घडणीत समकालीन जीवनाचा प्रभाव पडलेला जाणवतो. त्याचबरोबर कर्तृत्ववान व्यक्तीचा सहवास त्यांचे व्यक्तिमत्व घडवण्यास उपयुक्त ठरलेला आहे.   ज्यामध्ये अनेक थोर राजकीय व्यक्तीचा समावेश आहे. तसेच काँग्रेस पक्ष्याच्या विचारसरणीचा प्रभाव व समाजवादी विचारणीचा प्रभाव यशवंतरावांचा राजकीय पिंड घडवीण्यास उपयुक्त ठरलेला आहे. एकूणच या सर्व घटनांतून यशवंतराव चव्हाण यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व उदयास आले.

यशवंतरावांचा १९४६ मध्ये संसदीय सचिव या नात्याने सत्ताकारणात झालेल्या प्रवेशानंतर पूढे १९५२ मध्ये मंत्रिमंडळात प्रवेश, १९५६ मध्ये विशाल द्वैभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदी नियुक्ती व द्वैभाषीक राज्य सांभाळतांना त्यांची सर्वांगाने कसोटी लागलेली आहे. कारण या काळात मुख्यमंत्री म्हणून अतिशय संयमाने चांगले कार्य करत संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे मोठेआव्हान त्यांनी पेलले. यशवंतरावांच्या राजकीय जडण-घडणीच्या दृष्टिकोनातून हा काळ मोलाचा मानला जातो. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन आणि मराठी भाषिकांचे महाराष्ट्र हे नवे राज्य निर्माण होण्याला मोलाची मदत झाली.

संशोधन विषयाचे महत्व किंवा आवश्यकता :

भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी चळवळ करण्यास नेहरुंचा विरोध होता. कारण त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याला तडा जाईल, ही भीती त्यांना वाटत असावी. तरीही यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर पुरस्कर्ते होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९५३ च्या हैद्राबाद काँग्रेस अधिवेशनात भाषिक राज्य निर्मितीचा त्यांनी पाठपूरावाही केला; परंतु पुढे त्रिराज्य योजना, मुंबईचे केंद्रशासन विशाल द्वैभाषिक राज्य असा क्रम घडत गेला. त्यांनी द्वैभाषिकाला विरोध केला; परंतु ती राबविण्याची जबाबदारी स्वीकारली. कारण यशवंतरावांनी देशाचे स्वातंत्र्य, राष्ट्रीय ऐक्य व समाजवादी पुनर्रचना या बाबीस संयुक्त महाराष्ट्रापेक्षा अधिक महत्व दिले. यशवंतरावांची राजकीय निष्ठा काँग्रेस पक्षाशी निगडित होती. त्यांनी पक्षाची शिस्त बंधनकारक मानली. मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला होण्याचा धोका नाही, असे आढळून आल्यावर त्यांनी द्वैभाषिक राबविण्यास संमती दर्शविली. आणि आपली एकभाषिक राज्याबाबतची अनुकूल भूमिका श्रेष्ठीपुढे स्पष्ट केली. १९५६ ते १९६० या काळात यशवंतरावासमोर पुढील आव्हाने होती. काँग्रेसला सुस्थिर करणे, महाराष्ट्रातील जनतेचा राग कमी करणे, गुजराती भाषिकांचा संशय दूर करणे आणि केंद्रीय सत्तेचा विश्वास संपादन करणे, वरील कार्य करण्याचा ते सातत्याने प्रयत्न करित होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर होणाऱ्या प्रचंड सभा, जनतेचा उठाव, गोळीबार, सभा उधळणे, प्रतापगडाचा सामना असे अनेक प्रश्न निर्माण झाले. घोडे स्वाराप्रमाणे उपाशी-तापाशी ते धावत होते, महाराष्ट्र स्थिर होईल, संशय दूर कसा होईल, तो कमीकरून धोरण अंमलात कसे आणता येईल याची त्यांना चिंता वाटत होती. द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या समोर समस्यांचे अनेक ढीग होते, लोकांना बरोबर घेऊन उद्दिष्ट साध्य करावयाचे होते अणि त्यासाठी १९६० पर्यंत यशवंतराव प्रयत्न करित राहले. या अनुषंगाने त्यांच्या संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी ' यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त

महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास' या विषयाची निवड संशोधनासाठी करणे महत्वपूर्ण ठरते.

संशोधन समस्या (समस्यासुत्रण):

प्रस्तूत संशोधन सूरू करण्यापूर्वी संशोधनासाठी काही समस्या निश्चित करव्या लागतात. म्हणजेच 'यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास' हे शिर्षक निवडल्यानंतर त्या अनुषंगाने समस्यासुत्रण करण्यात आले आहे. स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचना हा राजकीय डावपेचाचा भाग बनला होता. मुंबई महाराष्ट्रापासून अलग ठेवण्याचे विदर्भाला स्वायत्त अस्तीत्व देण्याचे, डांगच्या बदल्यात मुंबईच्या भवितव्याचा विचार करण्याचे, विशाल द्वैभाषिक मोडण्याची किंमत म्हणून बेळगाव, कारवार वगैरे मराठी भाग कर्नाटकात सामाविष्ट करण्याचे महागुजरातच्या स्थापनेसाठी महाराष्ट्रकडून खंडणी वसुल करण्याचे वगैरे मनसुबे रचले जाऊ लागले, हा नुसता महाराष्ट्राच्या स्थापने संबंधी विचार झाला, या विचारांचे परिवर्तन घडवून आणन्याचे काम कठीण होते, ते या दृष्टीने की साऱ्या पुनर्ररनेचा गाभा म्हणजे मुंबई शहर महाराष्ट्रात सामील होण्यास असलेला सक्त विरोध करणे हा होता. हे अनेक महाराष्ट्रोत्तर नेते आणि भांडवलदारांचे प्रतिनिधी यांनी अव्याहत चालविलेल्या प्रयत्नातून सिध्द होते. १) मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य असावे? २) मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापना व्हावी? ३) कॉंग्रेस पक्षश्रेष्ठींना भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी अनुकूल करणे? ४) संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे नेतृत्व सक्रियपणे हाती घेणे? ५) द्वैभाषिकांचा प्रश्न संवेदशिलपणे हाताळणे?

इत्यादी समस्यांचा शोध घेण्यासाठी संशोधकाने उपरोक्त समस्या निश्चित केल्या आहेत.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. भाषावार प्रांतरचनेच्या विविध चळवळी व त्यामागील राजकारण समजून घेणे.

२. यशवंतराव चव्हाण यांचे जीवनकार्ये व जडण-घडण याचा अभ्यास करणे.

३. यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक व राजकीय विचार जाणून घेणे.

४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास जाणून घेणे.

५. संयुक्त महाराष्ट्राबाबत यशवंतराव चव्हाण यांची भूमिका जाणून घेणे.

६. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान अभ्यासने.

संशोधनाची गृहितकृत्ये :

१. भारतातील भाषावार प्रांतरचनेच्या सर्व चळवळी ही बाब अधोरेखित करतात की, या काळात भाषिक अस्मिता ही जातीय व धार्मिक अस्मितेपेक्षा अधिक जोमदार ठरली होती.

२. स्वातंत्र्यपूर्व काळात भाषावार प्रांतरचनेसाठी आग्रही असणारे काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व, भारताची धार्मिक आधारावर झालेली फाळणी व इतर गंभीर राष्ट्रीय प्रश्नांच्या पार्श्वभूमीमुळे काही ठिकाणी भाषावार प्रांतरचना करणे इष्ट असले तरीही ती आता न करता योग्य वेळ आल्यावर केली पाहिजे असे मानत होती.

३. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व हे समन्वयवादी नेतृत्व होते. आपली भाषिक व प्रादेशिक अस्मिता व संस्कृती अधिक उन्नत रुपात जतन करत, तिला भारतीय राष्ट्रीयतेशी एकरुप करण्याची समन्वयवादी दृष्टी व भूमिका संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांसदर्भात यशवंतराव चव्हाणांची राहिली आहे.

४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात विविध वैचारिक प्रवाहांच्या झालेल्या प्रगल्भ चिंतनातून महाराष्ट्राच्या भावी वाटचालीच्या दिशा निश्चित झाल्या त्यातूनच यशवंतराव चव्हाण यांच्या सर्वसमावेशक राजकारणाचा पाया रचल्या गेला.

संशोधन पध्दती :

प्रस्तूत शोधप्रबंधाचे लेखन करण्यासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक अभ्यास पध्दतींचा अवलंब करण्यात येईल.

संशोधनाचे स्त्रोत (तथ्य संकलन) :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी व तथ्य (माहिती) संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर अधिकाधिक प्रमाणात करण्यात आला आहे. त्यासाठी विविध ग्रंथ, एम.फिल., पीएच.डी.चे प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध, विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके आणि संदर्भ ग्रंथ, गौरवग्रंथ इत्यादी स्वरुपाच्या द्वितीय स्त्रोतांच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :

यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे. या संदर्भात पुर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्यावर मोठ्या प्रमाणात साहित्य आणि संशोधनात्मक लिखाण उपलब्ध आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यावरील उपलब्ध साहित्यांचे दोन भागात वर्गीकरण करता येईल. प्रथम स्वत: यशवंतराव चव्हाण यांचे लेखन यामध्ये शिवनेरीच्या नौबती (१९६१), सह्याद्रीचे वारे (१९६२), युगांतर (१९७०), ऋणानुबंध (१९७५), यशोधन (१९७७), भूमिका (१९७९), कृष्णाकाठ (१९८४), विदेश दर्शन (१९८८), शब्दांचे सामर्थ्य (२०००), यांचा समावेश होतो. आणि दुसऱ्या भागात यशवंतराव चव्हाण यांच्यावर विविधांगाने झालेले विपुल लेखन यांचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण यांच्यावरील

उपलब्ध असलेल्या विपुल साहित्यामुळे संशोधनात्मक साहित्याचा आढावा घेताना संशोधनात्मक उपयुक्त साहित्य आणि प्रस्तुत संशोधनाशी सुसंगत असलेल्या संशोधनाला प्राधान्य देण्यात आले आहे. हे सर्व लिखाण यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाच्या वेगवेगळ्या पैलुंच्या अनुषंगाने झालेले आहे ते पुढीलप्रमाणे आहे.

खेडेकर डी.ए. - यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील योगदान, २०१२, अप्रकाशित शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

या शोध प्रबंधामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये दिलेल्या योगदानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील यशवंतराव चव्हाण यांनी दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात आलेला आहे. याचबरोबर यशवंतराव चव्हाण यांची वैचारिक जडणघडण, संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमधील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका आणि त्यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील वैचारिक योगदान याचाही अभ्यास करण्यात आला आहे.

उमरकर अर्चना वसंतराव - आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरव चव्हाण यांच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील वैचारिक योगदानाचे विश्लेषणात्मक अध्ययन (१९५६ ते १९८४), २०१२, अप्रकाशित शोधप्रबंध, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

या शोध प्रबंधात यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय नेतृत्वाच्या जोरावर पार पाडलेल्या भूमिकेचे विश्लेषणात्मक अध्ययन केलेले आहे. यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणामध्ये विविधांगांनी पार पाडलेल्या त्यांच्या भुमिकांमध्ये त्यांचे नेतृत्व, कार्य, त्यांचे वैचारिक योगदान व या अनुषांगाने केलेले मुल्यामापण या प्रबंधामध्ये करण्यात आले आहे.

शिंदे मारोती महादेव - यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व, २००९, अप्रकाशित लघुशोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :

या लघु शोधप्रबंधात राजकीय दृष्टिकोनातून नेतृत्वाची संकल्पना व्यापक व सविस्तर स्वरूपात स्पष्ट केलेली आहे. त्याचबरोबर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाच्या गुणवैशिष्ट्यांचा व्यापक स्वरूपात आढावा घेण्यात आलाआहे. तसेच यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या विविध क्षेत्रात राज्य व केंद्र पातळीवरील कार्यांचा सविस्तरपणे आढावा या लघुशोध प्रबंधात घेण्यात आलेला आहे.

भदाने दशरथ महादू, यशवंतराव चव्हाण यांच्या वाड्याचा चिकित्सक अभ्यास; १९९९, अप्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे :

या प्रबंधात भदाने यांनी वाङ्मयीन प्रकारांची माहिती देऊन यशवंतराव चव्हाण यांच्या कृष्णकाठ, साह्याद्रीचे वारे, ॠणानुबंध, युगांतर, भूमिका या पुस्तकांच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण यांच्या सहित्याचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. या मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी लिखाण केलेले साहित्य विविध प्रकारांत मोडते. यशवंतरावांचे साहित्य व त्या साहित्याची वेगवेगळी वैशिष्ट्ये यांचे संशोधनात्मक विश्लेषण केलेले आहे.

दुकळे प्रकाश महादेव - यशवंतराव चव्हाण यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास, २००९, प्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर :

या प्रबंधामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास करण्याबरोबरच विविध वाड़यीन प्रकारांचे विश्लेषण केले आहे. तसेच यशवंतराव चव्हण यांच्या साहित्याचा व त्यांच्यावर लिहिलेल्या साहित्याचा वाङ्मयीन दृष्टिकोनातुन अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या प्रबंधामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे साहित्याशी संबंधित गुणांचे आणि संस्कृती विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा संशोधनात्मक स्वरुपात आढावा घेतला आहे.

संशोधनाचे कार्यक्षेत्र :

आधूनिक महाराष्ट्राचे शिल्पकार या शब्दात यशवंतरावांना गौरविले जाते त्यांची पाळमुळ संयुक्त महराष्ट्र चळवळीत सापडतात. यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्यात

सक्रीयपणे सहभाग घेऊन अनेक प्रसंगी लढ्याचे नेतृत्व खंबीरपणे आपल्या खांद्यावर घेतले त्यासाठी सभा, संम्मेलने, मेळावे, बैठका यांचे आयोजन केले या अशक्य प्रयत्नातून मुंबईसह मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य स्थापन केले. म्हणून संशोधकाने सदरिल संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य निर्मितीतील म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान हे संशोधनासाठी कार्यक्षेत्र निवडले आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास या संशोधन विषयाचे अध्ययन महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीशी निगडीत असून यशवंतरावांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीवर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन सदरील संशोधनाद्वारे केले जाणार आहे तरीही सामाजिक संशोधन समग्राशी निगडीत असल्यामुळे मानवी वर्तनावर समाजातील विविध घटनांचा प्रभाव पडत असतो त्यामुळे प्रस्तुत संशोधनात यशवंतराव चव्हाण यांच्या नेमक्या कोण-कोणत्या धोरणांचा व कार्याचा प्रभाव महाराष्ट्राच्या निर्मितीवर पडला आहे, हे वस्तुनिष्ठपणे जाणून घेणे शक्य नाही तसेच सामाजिक संशोधनात व्यक्तीनिष्ठ निरिक्षणामुळे वस्तुनिष्ठ तथ्यसंकलन करणे अशक्यप्राय आहे त्याचबरोबर सामाजिक संशोधनात घटनांच्या परिणामावर अनेक सामाजिक घटनांचा परिणाम होत असतो. सामाजिक संशोधनाची क्षमता भविष्य कथन करण्याची असते परंतु संशोधकाला अचूक,किंवा निश्‍चित निष्कर्ष हाती न आल्यामुळे निश्‍चितपणे उपाययोजना देखिल सुचविणे शक्य होत नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात काहीअंशी मर्यादा असू शकतील.

प्रकरणांची रुपरेषा :

प्रस्तुत संशोधनासाठी समस्यासुत्रण, उद्दिष्ट्ये, गृहितके, कार्यक्षेत्र, व्याप्ती व मर्यादा हे प्रमुख पैलू विचारात घेऊन त्यांची विभागणी व मांडणी पुढील पाच प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणात प्रस्ताविक स्वरुपात माहिती दर्शविली असून विषय प्रवेश, विषयाची प्रस्तुतता, संशोधनाचे महत्व किंवा आवश्यकता, समस्या निश्चिती किंवा समस्यासुत्रण, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहीतकृत्ये, संशोधन पध्दती, तथ्य संकलनाचे स्त्रोत, तंत्रे, संशोधनाचे कार्यक्षेत्र, संशोधनातील मर्यादा, पुर्व संशोधन साहित्याचा आढावा व प्रकरणांची रुपरेषा इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : यशवंतराव चव्हाण यांचे जीवनकार्ये व जडण-घडण

प्रस्तुत प्रकरण दुसरे यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा जीवन परिचय, जन्म, कौटुंबिक परिस्थीती, त्यांची वंशावळ, समकालीन वातावरण, कौटुंबिक संस्कार, बालपण, आई विठाबाईचे संस्कार, बंधू गणपतरावांची प्रेरणा, शैक्षणिक संस्कार, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, विविध ग्रंथांचे वाचन, वैचारिक वारसा, महान व्यक्तींचा सहवास, महापुरुषांची चरित्रे, वैवाहिक जीवन, विवाह ते तुरुंगवास, आत्मचरित्र, स्वातंत्र्य चळवळीतील कार्ये, नेतृत्वाची जडण-घडण इत्यादी महत्वपुर्ण घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक व राजकीय विचार

प्रस्तुत प्रकरणांमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या सामाजिक विचारांचा आढावा घेतांना प्रामुख्याने महाराष्ट्र पुढील सामाजिक प्रश्न, महार वतन कायद्याबाबतची भूमिका, बौद्ध जनांना सवलती देण्याबाबतची भूमिका, जातिभेद निर्मूलन व जातीय सामंजस्य, सामाजिक सुधारणा विषयक दृष्टिकोन, भूमिहीनांचा प्रश्न, समतेचा प्रश्न, हिंसाचाराचा प्रश्न, इत्यादी प्रश्नान बाबातचे यशवंतरावांचे समाजकारण अभ्यासले जाईल.

तसेच यशवंतरावांच्या राजकीय विचारांचा आढावा घेत असताना प्रामुख्याने महाराष्ट्राच्या विविध भागातील ऐक्या निर्मितीसाठीचे प्रयत्न, कुशल प्रशासकाची

जबाबदारी, लोकशाही विकेंद्रीकरण, ग्रामीण नेतृत्व उभारणी, महाराष्ट्रातील काँग्रेस व पक्षीय भूमिका, संयुक्त महाराष्ट्र व काँग्रेसच्या संदर्भातील कार्य, समन्वयवादी राजकारण इत्यादी महत्त्वपूर्ण घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास

प्रस्तुत प्रकरणात संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भाषिक राज्याची मागणी, मराठी भाषिक राज्याची मागणी, दार कमिशनची नियुक्ती, आंध्र राज्याची निर्मिती, नागपूर करार, राज्य पुनर्रचना समिती, मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीस गुजराथी नेत्यांचा विरोध, स्वतंत्र विदर्भाचा पाठपुरावा, राज्य पुनर्रचना कमीशन, काँग्रेस पक्षश्रेष्ठींशी चर्चा, द्वैभाषिकांचा पर्याय, शंकरराव देव यांची सुचना, यशवंतरावांची देशी वसाहतवादावरील टिका, द्वैभाषिकांच्या पर्यायाला विरोध, त्रिराज्य योजनेला विरोध, विरोधकांचे आंदोलन, त्रिराज्य विरोधी भाषणास प्रतिबंध, आमदारांचे राजीनामे विरोधकांची चौपाटीवरील जाहिर सभा, काँग्रेसच्या सुचनेवरून यशवंतरावांचा राजीनामा देण्यास नकार, शंकराव देव यांना यशवंतरावांचा विरोध, मुंबई केंद्रशासित प्रदेशाचा निर्णय, त्यावरील प्रतिक्रिया अमृतसर काँग्रेस अधिवेशन, मुंबई विधानसभेत केंद्रशासन योजनेस संमती, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे मुंबई येथील अधिवेशन, विशाल द्वैभाषिक राज्याच्या निर्मितीची वाटचाल इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : यशवंतराव चव्हाण आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

प्रस्तुत प्रकरणात विशाल द्वैभाषिक राज्याची निर्मिती, द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदी यशवंतरावांची निवड, महाराष्ट्र व गुजरात समोरील द्वैभाषिकाचे आव्हान, भाषिक राज्याचे फायदे द्वैभाषिक राज्यात प्राप्त करून देण्याचे यशवंतरावांचे आश्वासन, यशवंतरावांची विदर्भ दौऱ्यातील भुमिका, यशवंतरावांची सौराष्ट्र व कच्छ दौऱ्यातील भुमिका, १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीतील यशवंतरावांची भुमिका निवडणूकीतील निकाल, निपक्षपाती व कार्यक्षम राज्यकारभाराचे यशवंतरावांकडून आश्वासन, यशवंतरावांनी द्वैभाषिकाचा निर्भेळपणे केलेला पुरस्कार, द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून

यशवंतरावासमोरील प्रश्न प्रतापगडावरील शिवस्मारक समारंभातील यशवंतरावांची भुमिका, पोटनिवडणूकीत काँग्रेसचा पराभव, संयुक्त महाराष्ट्राची मागणी व द्वैभाषिकाबाबत यशवंतरावांची भुमिका, द्वैभाषिक राज्याच्या फेरविचाराबाबत यशवंतरावांचे मत, द्वैभाषिकाबाबत दिल्ली बैठकीतील पक्षश्रेष्ठींपुढे यशवंतरावांचा खुलासा, द्वैभाषिकाच्या फेरविचारावरील प्रतिक्रीया, यशवंतरावांची विदर्भ नेत्यांशी चर्चा, गुजरात प्रश्नाबाबत यशवंतरावांची मोरारजी देसाई यांच्या बरोबर चर्चा, हैद्राबाद येथे यशवंतरावांची पं. नेहरूशी चर्चा, द्वैभाषिकाचा फेरविचार, आणि महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीवरील मतमतांत्तरे, संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती, १ मे १९६० महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा सोहळा इत्यादी महत्वपूर्ण घटकांचा आढावा सदरिल प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये उपरोक्त प्रकरणांच्या आधारे संशोधन कार्याचे सिंहावलोकन करून थोडक्यात प्रकरण निहाय्य सारांश मांडण्यात येईल. तसेच सदरिल संशोधन प्रक्रियेतून हाती आलेले निष्कर्ष प्रतिपादित केले जातील. त्याचबरोबर गृहीतकृत्यांची सिध्दता पडताळण्यात येईल.

संदर्भसूची

अ) मराठी ग्रंथ :

१. कांबळे उत्तम, "यशवंतराव चव्हाण नव महाराष्ट्राचे शिल्पकार", सकाळ प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १ मे २०१२.

२. कायंदे पाटील गंगाधर वि., 'यशवंतराव चव्हाण', चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०००.

३. कुलकर्णी जी. व्ही., 'यशवंतराव चव्हाण: एक स्मरण', यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय, कराड, १९८६.

४. चव्हाण यशवंतराव, "कृष्णकाठ" आत्मचरित्र, खंड-१, रोहन प्रकाशन, मुंबई, जनआवृत्ती, २२ एप्रील २०१२.

५. चव्हाण यशवंतराव, 'यशोधन', यशवंतरव चव्हाण यांचे निवडक विचार, संकलक विनायक पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९७७.

६. चव्हाण यशवंतराव, 'सह्याद्रीचे वारे', प्रकाशक विनोदराव, संचालक प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी १९६२.

७. चव्हाण यशवंतराव, केसरी, संयुक्त महाराष्ट्र विशेषांक, प्रजासत्ताक दिन, १९६०.

८. चव्हाण शेषराव, 'यशवंतराव चव्हाण आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार', विमल पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९०.

९. चौगुले श्रीकांत, 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण', आविष्कार प्रकाशन, पुणे, २००२.

१०. जाधव पंजाबराव, 'भारताचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण', कर्मवीर प्रकाशन, पुणे, १९८८.

११. जाधव पंजाबराव, 'यशवंतराव जीवनदर्शन', कर्मवीर प्रकाशन, पुणे, १९६७.

१२. ठोके मो.नी., 'अस्मिता महाराष्ट्राची यशवंतराव चव्हाण', अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २०१२.

१३. तळवलकर गोविंद, 'यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व', मौज प्रकाशन, मुंबई,२०१२.

१४. थोरात संभाजी, 'यशवंतराव चव्हाण झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध', आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८.

१५. दुकळे प्रकाश, "यशवंतराव चव्हाण माणूस आणि लेखक", ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १२ मार्च २०१२.

१६. देशमुख शिवाजीराव, 'यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षा लेखन व भाषणे', कौशल्या प्रकाशन, सोलापूर.

१७. नाईकनवरे विश्वास, 'महाराष्ट्रभूषण यशवंतराव चव्हाण, श्रीगंधर्ववेद प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर,२०१०.

१८. पवार सी. डी., 'यशवंतराव विचार अमृत', प्रमोद प्रकाशन, मुंबई, २००२.

१९. पाटील अनंतराव, 'यशवंतराव चव्हाण', यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, १९९७.

२०. पाटील विठ्ठलराव वि., 'महाराष्ट्राचे शिल्पकार', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

२१. पाटील विठ्ठलराव वि., 'यशवंतराव चव्हाण यांचे निवडक मौलिक विचारधन', श्रीधर मुद्रणालय, कराड, २००३.

२२. बाबर कृ. भा., यशवंतराव चव्हाण- व्यक्तीत्व व कार्य, ठोकळ प्रकाशन पुणे-१९६०.

२३. महानोर ना. धों., 'यशवंतराव चव्हाण', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९१.

२४. माने डी. ए., 'शिल्पकार यशवंतराव चव्हाण', नयन प्रकाशन, विसापूर ता. तासगाव, सांगली, जानेवारी १९८९.

२५. रंजन परमार, यशवंतरावजी चव्हाण व्यक्ती और कार्य, ढोकळ प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९६०.

ब) इंग्रजी ग्रंथ :

1. Chavan Yashawantrao, 'Winds of Change',Somayya Publication Pvt. Ltd., Bombay, 1973.

2. Chavan Yashawantrao, 'India's Foreign Policy', Somayya Publication Pvt. Ltd., Bombay, 1978.

3. Chavan Yashwantrao, 'The Making of India's Foreign Policy', Allied Publication, New Delhi, 1980.
4. Chavan Yashwantrao, Selected Speeches in Parliament (Home Minister), Vol. I, Ameya Prakshan, Pune 1995, Edt. R.D. Pradhan.
5. Chavan Yashwantrao, Selected Speeches in Parliament (Defense and Home Minister) Vol. I, II, Ameya Prakashan, Pune 1995.
6. Chavan Yashwantrao, Selected Speeches in Parliament (Vol. iv) (External Affairs Minister's Leader), Opposition and Member of Parliament (1975-1984), Ameya Prakashan, Pune, 1999.
7. Chavan Yashwantrao, '1965 War, The Inside Story', Defense Minister Y.B. Chavan's Diary of India-Pak War, R.D. Pradhan, Atlantic Publishers and Distributers Ltd., 2007.
8. Chavan Yashwantrao, 'Selected Speeches in Parliament', Editor Pradhan R.D. Vol. III (Finance Minister), Vol. IV (External Affairs Minister) Ameya Pradkshan, Pune, 1999.
9. Shah Chandulal, 'Yashwantrao Chavan', Vidya Publishing House, Bombay, March 1963.

संशोधक

आश्विनी रामराव मगर

मार्गदर्शक

डॉ.विलास आघाव
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, हिंगोली